## उपमुख्यमंत्री श्री. आजगांवकर यांच्याहस्ते प्रिटींग आणि स्टेशनरी खात्यांमध्ये प्रिटींग मशीनचे उद्घाटन

ता. 13 जून 2019
23 ज्येष्ठ 1941

उपमुख्यमंत्री श्री. आजगांवकर यांनी प्रिटींग आणि स्टेशनरी खात्यांमध्ये 4 कलर प्रिटींग मशीन शीनोहारा-92 चे उद्घाटन केले. याप्रसंगी बोलताना श्री. आजगांवकर यांनी सदर खात्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रिटींग मशीन बसविल्याने खात्यातील सर्व कर्मचारी सदस्यांपुढे त्याचा वापर करण्यास नवीन आव्हान आणि जबाबदारी असल्याचे सांगितले तसेच सर्व सरकारी खात्यांचे काम पूर्ण करण्यास आणि सदर मशीनचा वापर योग्यरीतीने करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असल्याचे सांगितले.

उपमुख्यमंत्र्यांनी पुढे बोलताना अशा प्रकारचे उच्च तंत्रज्ञानाचे मशीन प्रिटींग आणि स्टेशनरी खात्यांमध्ये बसविण्याची कल्पना मुख्यमंत्री स्व. मनोहर पर्रीकर यांची होती असे सांगितले. श्री. आजगांवकर यांनी नवीन मशीन बसविण्यासाठी सहकार्य दिल्याबध्दल मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांची प्रशंसा केली.पूर्ण ऑटोमॅटिक मशीन शीनोहारा-92 साठी सुमारे 5 कोटी रूपये खर्च आला. एका तासाला 1600 गतीने सुमारे 70 जीएसएम ते 600 जीएसएम प्रिंट करण्याची त्यांची क्षमता आहे. हे मशीन 102.75 चौ.मी. वातानुकूलीत जागेत बसविण्यात आले आहे. सदर खात्यांमध्ये वीज यंत्रणासाठी इलेक्ट्रीकल खोली भुमिगत वाहिन्या ट्रेंचीस, मौड्ल्युलर फॉल्स सीलींग, एलईडी पेनल लायट, आरसीसी राफ्ट फाऊंडेशन इत्यादी सुविधा आहे. प्रिटींग आणि स्टेशनरी खात्याचे संचालक श्री. दामोदर शंके यांनी स्वागत केले आणि शीनोहारा-92 हे गोव्यातील पहिले मशीन असल्याची माहिती दिली. उपसंचालक श्री. ॲन्ड्रू पेरेरा हे यावेळी उपस्थित होते.

मा/वाप/नामगा/जॉआ/रना/प्रधु/2019/334